**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ६६४/२०२२ – निशाणी ०५ खालील आदेश</u>**

चंद्रकांत संदिपान केंगार इ. वि. मनोहर गणपत केंगार इ.


CNR NO. MHSO20-002693-2022


प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, रुल १, २ प्रमाणे प्रतिवादी यांनी दावा कलम १ मधील मिळकतींच्या वादीच्या शांततामय कब्जास हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत मिळण्यासाठी दाखल केला आहे.


०२. **मिळकतीचे वर्णन** – मौजे उदनवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील जमिन मिळकत गट नंबर ९, क्षेत्र १हे-३४आर, (मुळ सर्वे नं.२/१अ/१ब/१अ/अ क्षेत्र ३ए. १३गुं.)

येणे प्रमाणे मिळकतीपैकी ४१.८७आर दाव्याचा विषय असे.

०३. वादी, प्रतिवादी यांची दाव्यास लागुपुरती वंशावळ की,



भाऊसाहेब (मयत)

अनुसया (मयत)

भिवा (मयत)

भामा

अनिल सुनिल साधना सविता

येणेप्रमाणे वंशावळ असे.

०४. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, सदर वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब होते व सदर दावा मिळकत हि वडिलार्जित मिळकत असुन मुळ पुरूष शंकर याची मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये वारसाने वादीचा को पार्सनर म्हणुन हक्क व हिस्सा आहे. सदर दावा मिळकत क्षेत्र ०हे–४१.८७आर पुर्णपणे सदर वादींची शिल्लक मिळकत राहिलेली आहे. सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा कोणताही हक्क व हिस्सा राहिलेला नाही. सदर शंकर हे वादी यांचे मुळ पुरूष होते. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये संपूर्ण वादीचा हिस्सा राहिलेला आहे. सदर मिळकतीमध्ये वादींना त्यांचा हिस्सा मिळालेला नाही. त्यामुळे प्रतिवादींना सदर मिळकतीमध्ये आता कोणताही हिस्सा व हक्क राहिलेला नाही.

०५. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर मिळकतीचा मुळ सर्व्हे नंबर २/१अ/१व/१अ/अ असा होता. त्याचे क्षेत्र ३ एकर १३ गुंठे असे होते. सदर मुळ खातेदार शंकर सखाराम केंगार यांचा सदर मिळकतीमध्ये ८ आणे हिस्सा होता. सदर शंकर हे ता. २७/५/१९६४ रोजी मयत झाले आहेत. हे वादींचे पुर्वज मुळ पुरूष होते. त्यांचे पश्चात वारस म्हणुन मयत गणपत, संदिपान, भाऊसाहेब, भिवा व जाई असे ४ मुले व १ मुलगी होती. सदर मयत संदिपान यांचे वादी नं १ ते ५ हे कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतीस ८ आणे हिश्यामध्ये ए. कु.में म्हणुन केवळ मयत गणपत शंकर केंगार यांचे नाव लागले. वास्तवतः एकुण ५ वारस होते दरम्यान सदर मिळकतीस गट नंबर ९ असा देण्यात आला होता. सदर

मिळकतीपैकी मयत गणपत शंकर केंगार व भाऊसाहेब शंकर केंगार यांनी त्यांचा असणारा हिस्सा दि. ११/८/२००४ रोजी दत्तात्रय भगवान आलदर यांना क्षेत्र ०हे–२५.१२आर विकी केलेले आहे. त्याप्रमाणे फेरफार नंबर ६६७ प्रमाणीत झाला. त्यामुळे मयत गणपत व भाऊसाहेब यांचा दावा मिळकतीत कोणताही हिस्सा राहिलेला नाही. तसेच त्यांचे वारस प्रतिवादी यांचा देखील दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हिस्सा राहिलेला नाही. परंतु सदर प्रतिवादी हे सदर दावा मिळकत गट नंबर ९ क्षेत्र ०हे–४१.८७आर त्यांची नावे असल्यामुळे सदर मिळकत विकी करणेच्या प्रयत्नात आहेत तशी त्यांची बोलणी गावातील इसमांसोबत चालु आहे. त्यामुळे सदर वादींनी दि. २५/११/२०२२ रोजी माणदुत एक्सप्रेसमध्ये सदर दावा मिळकत कोणीही खरेदी करू नये म्हणुन जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. परंतु सदर प्रतिवादी हे ऐकणेच्या मनस्थितीत नाहीत व ते सदर मिळकत विकी करणेच्या तयारीत आहेत. असे झालेस सदर वादींचे अतोनात नुकसान होवुन त्यांचा असणारा हिस्सा प्रतिवादी हे बुडविणेचा प्रयत्न करीत आहेत.

०६. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर गट नंबर ९ च्या बाबत सदर वादींनी दि. २४/११/२०२२ रोजी प्रतिवादींना त्यांचा असणारा जमिनीतील संपूर्ण हिस्सा मागितला असता सदर प्रतिवादींनी त्यास स्पष्टपणे नकार दिला व आम्ही राहिलेले क्षेत्र देखील विकी करणार आहे अशी धमकी वादींना दिली. त्यामुळे सदर दाव्यास कारण घडले व रोजचे रोज घडत आहे. तसेच वादींनी वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रसिध्दीकरण देखील करून सदर प्रतिवादी हे दावा मिळकत विकी करणेचा प्रयत्न करीत आहेत व वादीचा असणारा हिस्सा बुडविणेचा प्रयत्न करणार आहेत म्हणुन अर्जास कारण घडले आहे व रोजचे रोज घडत आहे.

०७. वादीचे पुढे असे कथन आहे की, मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. वादीने प्रायमा फेसी केस मांडलेली असून बॅलन्स ऑफ कनव्हेनिअन्स वादीचे बाजूने आहे. यातील प्रतिवादी हे दावा मिळकत स्वतःचे नावावर असल्याचा गैरफायदा घेण्याचे हेतूने सदरची दावा मिळकत त्रयस्थ इसमास विकी करण्याचे प्रयत्न चालु केलयाचे वादीस समजले आहे. त्यामुळे यातील प्रतिवादी यांनी सदरची दावा

मिळकत विकी केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. म्हणून यातील प्रतिवादी यांना दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा मिळकतीची त्रयस्थ इसमांचे हक्क प्रस्थापित होतील अशी कोणतीही खरेदी, विकी, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, बोजा इत्यादी प्रकारचे हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत म्हणून प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी. तुर्तातुर्त ताकीद दिल्यास प्रतिवादीचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट ताकीद न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब हा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०८. सबब, वादीने अशी विनंती केली आहे की, मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची त्रयस्थ इसमांचे हक्क प्रस्थापित होतील अशी कोणतीही खरेदी, विकी, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, बोजा इत्यादी प्रकारचे हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत म्हणून प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी.

०९. प्रतिवादी क्र.१, २, ३, ४, ५, ६अ ते ६इ, ७ हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही.

१०. वादी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एम. भोसले यांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या कथनावरून माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. निष्कर्ष मी कारणमीमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींना प्रथमदर्शनी केस असल्याचे वादी सिद्ध करतात काय? | नकारार्थी |
| २. | दाव्याचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे वादी सिद्ध करातात काय? | नकारार्थी |
| ३. | वादींचे बाजूने आदेश दिला नाही तर वादींचे नुकसान होत असल्याचे सिद्ध करतात काय? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

११. वादीतर्फे विधीज्ञांनी अभिलेखावर खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १. | उदनवाडी येथील फेरफार क्र.७६७ चा ६ड चा उतारा | ४/१ |
| २. | गट नं.९ चा ७/१२ उतारा | ४/२ |
| ३. | उदनवाडी येथील फेरफार क्र.१५८२ चा ६ड चा उतारा | ४/३ |
| ४. | गणपत शंकर केंगार यांचा मयताचा दाखला | ४/४ |
| ५. | शेवंताबाई शंकर केंगार यांचा मयताचा दाखला | ४/५ |
| ६. | भिवा शंकर केंगार यांचा मयताचा दाखला | ४/६ |
| ७. | संदिपान शंकर केंगार यांचा मयताचा दाखला | ४/७ |
| ८. | संदिपान शंकर केंगार यांचा शाळा सोडल्याचा छायांकित प्रत | ४/८ |
| ९. | भिवा शंकर केंगार यांचा शाळा सोडल्याचा छायांकित प्रत | ४/९ |
| १०. | उदनवाडी येथील फेरफार क्र.७६७ | २२/१ |
| ११. | उदनवाडी येथील फेरफार क्र.८३१ | २२/२ |
| १२. | गट नंबर ९ चा सन १९७२–१९७३ ते १९८४–१९८५ चा ७/१२ उतारा | २२/३ |
| १३. | गट नंबर ९ चा सन १९८६–१९८७ ते १९९५–१९९६ चा ७/१२ उतारा | २२/४ |
| १४. | गट नंबर ९ चा सन १९९६–१९९७ ते २००६–२००७ चा ७/१२ उतारा | २२/५ |
| १५. | उदनवाडी येथील गट नंबर ९ बाबतचे दस्त नं.१८/४३/२००४ नुसार दि.११/८/२००४ रोजीचे खरेदी खत. | २२/६ |

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता

१२. मुद्दा क्र. १ ते ३ याचे विश्लेषण एकमेकाशी निगडीत असल्यामुळे त्याचे गुणग्रहण एकत्रितरित्या केले आहे.

१३. वादींना तुर्तातुर्त ताकीद मिळविणेसाठी सकृतदर्शनी केस, तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होईल. तसेच न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने आहे या गोष्टी सिध्द करणे आवश्यक आहे.

१४. प्रस्तुत दावा सरस निरस मानाने वाटपाचा व पृथक कब्जाचा दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत गट क्र.९ याचा मुळ सर्वे नंबर २/१अ/१ब/१अ/अ असा होता. सदरची मिळकत वादीचे पूर्वज शंकर केंगार यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची होती. सदर मिळकतीमध्ये शंकर केंगार यांचा ८ आणे हिस्सा होता. शंकर केंगार दि.२७/०५/१९६४ रोजी मयत झाले. त्यांच्या पश्चात त्यांना गणपत, संदिपान, भाऊसाहेब, भिवा व जाई अशी चार मुले व एक मुलगी होती. शंकर केंगार यांच्या मृत्यूनंतर एकत्र कुटूंबाचा कर्ता म्हणून गणपत केंगार यांचे नाव लागले. वादीने सदर कथनांचे पृष्ठ्यर्थ फेरफार क्र.६७६ चा उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता गणपत केंगार यांच्या नावाची नोंद सर्वे नंबर २/१अ/१ब या मालमत्तेला सामाईक म्हणून झाल्याचे दिसुन येते. वादीने फेरफार क्र.१५८२ चा उतारा हजर केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गणपत केंगार यांच्या मृत्यू नंतर वारस म्हणून प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद गट क्र.९ च्या अनुषंगाने झाली आहे. सदरची नोंद दि.३१/०७/२०१५ रोजी प्रमाणित केली आहे.

१५. वादीचे असे कथन आहे की, गणपत केंगार व भाऊसाहेब केंगार यांनी दि.११/०८/२००४ रोजीच्या खरेदीखताने ०हे–२५.१२आर इतके क्षेत्र दत्तात्रय भगवान आलदर यांना विक्री केली आहे. वादीने सदर कथनांच्या पृष्ठ्यर्थ फेरफोर क्र.७६७ चा उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता गणपत केंगार व भाऊसाहेब केंगार यांनी गट क्र.९ मधील ०हे–२५.१२आर इतक्या क्षेत्राची विक्री केल्याचे दिसुन येते. वादीचे महत्वपूर्ण असे कथन आहे की, गणपत केंगार व भाऊसाहेब केंगार यांनी त्यांचा गट क्र.९ मध्ये असणारा अविभक्त हिस्सा विक्री केला आहे व उर्वरित गट क्र.९ मधील ०हे–४१.८७आर इतके क्षेत्र वाटणीनुसार वादीच्या हक्कास आहे. वादीच्या कथनांवरुन असे दिसुन येते की, वादीचे वडील संदिपान यांच्या व्यतिरीक्त भिवा व जाई यांचाही एकत्र कुटूंबाच्या मालमत्तेमध्ये अधिकार आहे. परंतू वादीने त्यांच्या दावा मिळकतीतील हक्कांबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे सकृतदर्शनी वादीच्या कथनांबाबत साशंकता निर्माण होते.

१६. वादीचे असे कथन आहे की, गणपत केंगार यांनी त्यांचा अविभक्त हिस्सा विक्री केला असतानाही त्यांच्या वारसांच्या नावाची नोंद गट क्र.९ च्या ७/१२ उता–यास झाली

आहे. वादीने गट क्र.९ चा ७/१२ उतारा हजर केला आहे आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गणपतचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या नावाची नोंद सामाईक क्षेत्रास ७/१२ उता–यास झाली आहे. परंतु सदरची नोंद फेरफार क्र.१५८२ नुसार झाली आहे. यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे सदरचा फेरफार दि.३१/०७/२०१५ रोजी प्रमाणित करण्यात आला आहे. वादीने सदर महसुल अभिलेखाबाबत सक्षम कार्यालयामध्ये दाद मागितलेली दिसून येत नाही. तसेच दरम्यानच्या काळात गणपतच्या वारसांच्या नावाची ७/१२ उता–यास नोंद आव्हानित केलेली नाही. यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे फक्त वादीच गट क्र.९ मध्ये ४१.८७आर क्षेत्राचा हिस्सा मिळण्यास पात्र आहे असे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. वादींनी इतर वारसांच्या हक्काबाबत कथन केलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या नावे असणारे महसुल अभिलेख आव्हानित केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी दावा मिळकत वादीच्या हक्कांना डावलून त्रयस्थ व्यक्तिंना विक्री करत आहेत असे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. वादींनी प्रतिवादी कोणत्या व्यक्तिला दावा मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत हे नमूद केले नाही. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दिले नसले तरी वादींनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ सबळ बाबी अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. वादी मागणी करत असल्याप्रमाणे तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. न्यायाचा तराजू वादीच्या हक्कात नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.24 15:10:12 +0530

**(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला

सांगोला
दि. १३/०३/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Court | : | Smt. P. R. Kulkarni<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C., Sangola |
| (a) | Name of Stenographer | : | S. S. Patne |
| (b) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/03/2026 |
| (c) | Judgment /Order uploaded on | : | 24/03/2026 |